// सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,नाशिक
शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सामनगांव रोड,नाशिकरोड, - ४२२ १०१.
फोन - (०२५३) २४६१४७९, फॅक्स - (०२५३) २४५५३०१ ई-मेल - ronashik.dte@gmail.com
website – www.dtensk.org

दिनांक :- २१/०६/२०१०

जा.क्र.तंशि/विकाना/आस्था-२/२०१०/११२४

## सूचना

तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नाशिक या कार्यालयाच्या अधिपत्याखालील विविध कार्यालयातील वर्ग ३ (गट क) च्या संवर्गातील (शिक्षकेत्तर) **वरिष्ठ लिपीक, लिपिक टंकलेखक, भांडारपाल, विजतंत्री, लोहार , प्रयोगशाळा सहाय्यक** ही रिक्त असलेली व भविष्यात रिक्त /उपलब्ध होणा-या पदांसाठीची निवड/प्रतिक्षासूची तयार करण्यासाठी दिनांक. १८ एप्रिल २०१० रोजी दैनिक सकाळ - नाशिक, जळगांव, धुळे, नंदुरबार या आवृत्तींमध्ये व दैनिक गांवकरी -अहमदनगर आवृत्तीमध्ये जाहीरात देवून तसेच महाराष्ट्र शासनाच्या व या विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर जाहीरात प्रसिध्द करुन दिनांक. ३ मे २०१० पर्यंत उमेदवारांकडून अर्ज मागविण्यांत आलेले होते. त्याप्रमाणे उमेदवारांचे अर्जही प्राप्त झालेले आहेत. त्याचप्रमाणे रोजगार व स्वयंरोजगार विभागाकडून व जिल्हा सैनिक कल्याण कार्यालये यांचेकडून उमेदवारांच्या यादया मागविण्यात आलेल्या होत्या त्याही प्राप्त झालेल्या आहेत.

तथापि महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाचा शासन निर्णय क्र.असंक-१०१०/प्र.क्र.-१/ २०१०/वित्तीय सुधारणा १, दिनांक ५/६/२०१० नुसार शासन निर्णयात नमूद पदे वगळून शासनाने शासकीय विभाग आणि कार्यालयांतील व शासन अनुदानित संस्थांमधील गट क व गट ड संवर्गातील (म्हणजे ज्या पदाच्या वेतनश्रेणीतील कमाल वेतन पाचव्या वेतन आयोगानुसार रुपये ९०००/- पेक्षा कमी आहे व ६ व्या वेतन आयोगानुसार ग्रेड पे रुपये ४३००/- किंवा त्यापेक्षा कमी आहे अशी पदे) पदभरतीस सदर शासन निर्णयाच्या दिनांकापासून १ वर्षाच्या कालावधीसाठी निर्बंध घालण्यात आलेले आहेत. यास्तव उपरोक्त पदांचा दिनांक.५.६.२०१० रोजीच्या शासन निर्णयात निर्बंध घालण्यात आलेल्या पदांमध्ये समावेश असल्याने या विभागीय कार्यालयामार्फत उपरोक्तप्रमाणे सरळसेवा पद भरतीकरीता प्रसिध्द केलेल्या जाहीरातीच्या अनुषंगाने सरळसेवा भरती प्रक्रीयेची कार्यवाही पुढील आदेशापर्यंत स्थगित ठेवण्यांत येत असून यासंबंधित शासनाचे पुढील आदेशानुसार कार्यवाही करण्यांत येईल, याची सर्व उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी.माहितीसाठी या कार्यालयाची **www.dtensk.org** ही वेबसाईट पहावी

सही

( डॉ.श्री.स.नायडू )
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नाशिक